Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

April-2019 Special Issue – 182 (H)

## Contemporary Innovation

**Guest Editor:**
Dr. Nilesh N. Gawande
Principal,
Late B. S. Arts, Prof. N. G. Science &
A. G. Commerce College, Sakharkherda
Tq. Sindkhed Raja, Dist. Buldhana

**Executive Editor:**
Mr. Prakash S. Kolhe
Librarian,
Late B. S. Arts, Prof. N. G. Science &
A. G. Commerce College, Sakharkherda
Tq. Sindkhed Raja, Dist. Buldhana

**Chief Editor:**
Dr. Dhanraj Dhangar (Yeola)

Local Organising Committee

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. R. P. Zanke | Dr. M. N. Gawande | Prof. S. V. Jaunjal | Dr. S. R. Dutonde |
| Prof. P. S. Kolhe | Prof. S. R. Gawai | Dr. P. R. Gaikwad | Prof. G. D. Kakade |
| Prof. P. P. Thakare | Prof. S. S. Gawai | Dr. R. P. Kitke | Prof. A. G. Barde |
| Dr. P. R. Mahalle | Prof. A.S. Ghayal | Dr. C. S. Khodre | Dr. R. V. Chaurpagar |
| Dr. N. P. Tale | Prof. P. S. Shimbre | Prof. S. R. Nagmote | Dr. V. R. Panse |
| | Prof. A. G. Kulkarni | Prof. R. V. Popalghat | |

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

T.C.

Assistant Professor
Shivaji Co...
Tq.&...

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

RESEARCHJOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 182(H) Contemporary Innovation
UGC Approved Journal

ISSN : 2348-7143
April-2019

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Various Constituents and their Activity of ECLIPTA ALBA | Anil D. Gatole & Vishal G. Zarekar | 06 |
| 2 | Bacterial Flora on the Surface of Used Writing Pen | Ashwini Dukare and A. M. Garode | 11 |
| 3 | Knowledge Management in Libraries | Dr.Vikram Dahifale and Balasaheb T Deshmukh | 14 |
| 4 | Bacteriological Study of Drinking Water Quality in Railway Stations of Buldana District | Dipak S. Dahatonde and A.M. Garode | 18 |
| 5 | Agricultural Finance System in Maharastra. | Prof. Dr. K.N. Shewale | 22 |
| 6 | Promotion of Use of E-resources in Arts Commerce & Science College Arvi Library | Dr. Manisha R. Khakre | 26 |
| 7 | Managerial and Personal Attributes for Creative Leadership of Academic Librarians | Dr. Ravindra D. Sarode | 34 |
| 8 | A Study of Qualitative and Innovative Management Practices for the Development in Banking Sector | Dr. Vivek V. Patil | 39 |
| 9 | Code of Ethics A Need for Library Professionals of Sant Gadge Baba Amravati University Amravati | Dr.Pradnya H. Kshirsagar | 46 |
| 10 | Agriculture and Agro Business | Pro.Dr.S.B. Gaykwad | 52 |
| 11 | Determination of Bacterial Load on Toilet Door Handles of Train Coaches: Sanitation and Hygiene in Indian Railway | Kishor Helge and A. M. Garode | 56 |
| 12 | Social Networking and Innovative Library Services in Digital Environment and Role of Library Professionals | Ms. Manjusha M. Mamilwar | 59 |
| 13 | Evaluation of Pathogenic Bacterial Flora on Physician Stethoscope | Pooja Harlalka and A. M. Garode | 65 |
| 14 | Microbial contamination of currency coins in circulation: A Potential Public Health Hazards | Pranita S. Pingle and A. M. Garode | 68 |
| 15 | Isolation of Inner Airflora of Pathogenic Bacteria from Kitchen Refrigerator | Prinyanka K. Sinkar, and A. M.Garode | 74 |
| 16 | Social Realism reflected in the select work of Kiran Desai | Sachin R.Gawai | 78 |
| 17 | Isolation of Pathogen from the Surface of Household Vegetable Cutter Knives and Meat Choppers | Shruti S. Gosawi and A. M. Garode | 81 |
| 18 | Physical Science As A Yoga Therapy | Dr. Sangita M. Khadse | 84 |
| 19 | योगद्वारा चिन्ता ओर घबराहट दुर करने का अभ्यास | डॉ. जी.पी. नलगे | 89 |
| 20 | महिलांच्या सामाजिक परिवर्तनाचे विश्लेषणात्मक अध्ययन | प्रा. अमरिष एस.गावंडे | 93 |
| 21 | आदिवासी वर्गजाणीवेच्या कवितेतून प्रकटणारे समाजभान | डॉ.श्रीकृष्ण पदमणे | 97 |
| 22 | ग्रंथालय व्यवस्थापनामध्ये मनोरेखनाचे महत्त्व : एक अध्ययन | डॉ.जी.आर.पवार | 103 |
| 23 | शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कन्नड ग्रंथालयात दिल्या जाणाऱ्या उत्कृष्ट सेवा - सुविधांचा अभ्यास | प्रा. संतोष देशमुख | 108 |
| 24 | संयुक्त महाराष्ट्र चळवळी आणि नागपूर करार | डॉ. एम.आर.शिंदे | 112 |
| 25 | केंद्रीय माहिती आयोग | डॉ. आर.जी.सुरळकर | 116 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.* *- Chief & Executive Editor*

Assistant Professor
Shivaji College Hingoli
Ta.& Dist.Hingoli



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

63

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 182(H) Contemporary Innovation
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
April-2019

# ग्रंथालय व्यवस्थापनामध्ये मनोरेखनाचे महत्व : एक अध्ययन

डॉ. पवार जी. आर.
ग्रंथपाल
शिवाजी महाविद्यालय,हिंगोली.
Mail id- ganpatpawar3@gmail.com

सार

बुध्दी मापनाचे प्रयत्न फ्रांस देशामध्ये इ.स.१९०४ मध्येझाले आहे. आल्फ्रेड बीन यांनी १९१८ मध्ये बुध्दी मापनाची पहिली मोजपट्टी तयार केली. यानंतर भारतात पण वेगवेगळया मानसशास्त्रज्ञाने बुध्दी मापनाचे प्रयत्न केले. सामुहिक आणि वैयक्तीक गट अशा दोन कसोटयाव्दारे बुध्दीचे मापन केले जाते. बुध्दीमापनाचा उपयोग ग्रंथालयातील कर्मचा–यांना दैनंदिन कामकाज व व्यवस्थापनात बदल घडून आणण्यास मदत मिळते. मानसिक व शारिरीक वय यांच्यावर बुध्यांकनाचे मापन केले जाते. त्याच बरोबर बुध्दीमापनामुळे पाय–या आणि गुण, दोष व वैशिष्टयांची माहिती मिळते.

प्रस्तावना

समाजात जीवन जगत असताना अनेक समस्यां उभ्या राहतात. अशा अनेक समस्या मानव बुध्दीच्या जोरावर सोडवू शकतो. मानव हा बुध्दीमान प्राणी आहे. मानवाला मन आणि बुध्दी या दोन मिळालेल्या सर्वात मोठी देणगी आहे. बुध्दीच्या जोरावर मानव हा इतर प्राण्यांत सर्वश्रेष्ट ठरला आहे. मात्र सर्वच मानवाची, व्यक्तीची बुध्दी सारखीच असू शकत नाही. बुध्दी ही निसर्गाने दिलेली देणगी आहे. मानसीक शक्तीच आहे. बुध्दी अनुवंशीक आहे. ती मूर्त स्वरूपाची संकल्पना आहे. बुध्दीही अनुवंशीक असली तरी एका विशिष्ट मर्यादेपर्यंत विकास साधता येतो. साधारणत:१५–१६ वर्षे वयोपर्यंत बुध्दीची वाढ होते. त्यानंतर मात्र बुध्दीचा विकास फारसा संभवत नाही. या बुध्दीची वाढ व विकास पाहाण्यासाठीच बुध्दीमापन या संकल्पनेचा उदय झालेला दिसून येतो. बुध्दीचे मापन करता येईल असे प्रयत्न प्रामुख्याने मानसशास्त्रज्ञाने बुध्दीमापन करण्यासाठी खुप परिश्रम घेतले आहे. मनोरेखन हे अद्यावत व्यवस्थापनातील तंत्रापैकी एक तंत्र आहे. त्याचा विकास १९६० नंतर होत गेला. या मध्ये मनाच्या तळाशी जाऊन त्याचा शोध घेणे आणि मनोव्यापर समजावुन घेणे काही सोपे नाही.कित्येकदा अनेक विचार कल्पना आणि युक्ती मनात चमकुन नष्ट होतात.एकाच वेळी अनेक विचारही मनात गोंधळ करतात.अशा वेळी मनोरेखन तंत्राचा वापर केला जातो. मनोरेखन करतांना मुख्य विषय लक्षात घेऊन त्यांच्या संबंधीच्या उपविषयाचे आरेखन केले जाते.टोनी बुझान यांनी विचारांना आणि कल्पकतेला वाव देण्याऱ्या मनोरेखन तंत्राबद्दल "युज युवर हेड" या पुस्तकामध्ये मांडले.तसेच सर्जनशील क्षेत्रात हे तंत्र मान्यता पावले आहे. उत्तम अभ्यास तंत्र म्हणुनही महत्वाचे ठरले आहे. तंत्राचा आणि माहितीशास्त्रात उपयोग होऊ लागला आहे. आपले मनोव्यापार व्यवस्थितपणे मांडुन एखाद्या विषयाचा सखोलपणे शोध घेणे ही प्रक्रिया या तंत्राच्या मुळाशी आहे. या तंत्रात शब्द, रेषा, आकृत्या, रंग, प्रतिमा यांचा मुक्त वापर केलेला आढळतो, हे तंत्र आपल्या कल्पना सुव्यवस्थीत पणे व सुसंगतपणे मांडण्यासाठी, नव्या कल्पना सुचविण्यासाठी या तंत्राचा उपयोग होतो. एखाद्या गटाकडुन विविध कल्पना भराभर जमवुन त्यांची तर्क सुसंगत मांडणी ही या तंत्रात केली जाते.

या विचारांना व कल्पनांना वाव देणारे तंत्र Tony Buzanयाने विकसित केले. Tony Buzanहयांना स्वत:चा अभ्यास करताना हे तंत्र गवसले. अभ्यासासाठी काढलेली टिपणे व स्मरणशक्ती यांचा मेळ घालणे Tony Buzanहयांना अवघड जात होते. स्मरणशक्तीला मदत करण्यसाठी महत्वाचे शब्द व कल्पना लाल रंगात

T.C
Assistant Professor
Shivaji College Hingoli
Ta & Dist Hingoli



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli
64

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 182(H) Contemporary Innovation
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
April-2019

अधोरेखित करण्यास त्यांना सुरुवात केली व महत्वाच्या गोष्टीभोवती चौकट आखण्यास सुरुवात केली. यामुळे त्यांना गोष्टी लक्षात ठेवणे सोपे होऊ लागले आणि त्यातुनच मनोरेखन तंत्राचा उगम झाला. ग्रीक लोकांना स्मरणषक्ती वाढविण्यासाठी Imagination व Association म्हणजे कल्पनाशक्ती व तिची सांगड याचा वापर केला होता. यावरच हे मनोरेखन तंत्र आधारित आहे.

मनोरेखन म्हणजे विचार करण्याचे तंत्र. Buzanम्हणतोA mind map is the easiest way to put imformation into your barin and to tab information out of your brain It's a creative and effective means of note taking that literally" maps out" you thoughts'.

मनोरेखन तंत्राचे वैशिष्टे

१) मध्यभागी असलेली विषय प्रतिमा.

२) या मुळ विषयाशी निगडीत त्यातुन निघणाऱ्या विषयशाखांचे निदर्शन

३) या विषयशाखेशी निगडी उपविषयाचा उपशाखांचे निदर्शन.

४) सर्व शांखांचे व उपशाखांचे आरेखन केलेला एकत्रित कल किंवा आलेख.

**मनोरखनाची आवश्यकता**

१) ज्ञान आद्यावत ठेवण्यासाठी बुध्दीमापनाची गरज आहे.

२) भविष्याचा वेध घेण्यासाठी बुध्दीमापनाची आवश्यकता आहे.

३) कामामध्ये अडथळा फ्रांस देशामध्ये आल्यावर समन्वय ठेवून कामाचा दर्जा वाढविण्यासाठी बुध्दीमापनाची आवश्यकता आहे.

४) ग्रंथालयातील किंवा संस्थेतील कर्मचा–यांना सतत कार्यमग्न ठेवण्यासाठी बुध्दीमापनाची आवश्यकता आहे.

५) अडथळयाचे निराकरण करण्यासाठी बुध्दीमत्तेची गरज आहे.

मनोरखनाचा उपयोग

बुध्दीमापनाचा उपयोग अनेक ठिकाणी होतो. त्यात प्रामुख्याने कौटुंबीक, व्यक्तीगत, शैक्षणिक आणि व्यावसायिक स्थिती ज्यामध्ये टाचणी घेणे बुध्दीमंथन, उद्रेक, सारांश समालोचन आणि सामान्य विचारांची स्पष्टता असावी. उदा. एखादा व्यक्ती, अध्ययनकर्ता प्राध्यापकाचे शिकवणी ऐकतो आणि बुध्दीमापनाचा उपयोग करून घेवून महत्वाचे मुद्दे किंवा मुख्य शब्दाचे अर्थ व टाचन काढू शकतो. व बुध्दीमापन आपण हाताने रेखाटू शकतो किंवा कच्चे टाचन काढून गुणवत्तापूर्ण माहिती देता येते.

**ग्रंथपालासाठी मनोरेखनाचा उपयोग**

बुध्दीमापन करणे हे ग्रंथपालाच्या दृष्टीने एक सहितांस होय. यामध्ये प्रामुख्याने प्रशिक्षण आणि इतर सहकार्याशी सहका–यांच्यां माध्यमातून लेखी स्वरूपाच्या ग्रंथालय कामकाजाचे आराखडा आणि अंतर्गत व्यवस्थापन करण्यासाठी बुध्दीमापन उपयोगी ठरते. उदा. एखाद्या विशिष्ट शिपायाच्या बुध्दीतून एखादी चांगली व दर्जेदार योजना अथवा सूचना सूचविली जाऊ शकते. ज्यामुळे सर्व ग्रंथालयाचा कायापालट होईल. अशा सूचनांचा विचार करणे त्या कर्मचा–यांच्या बुध्दीचे मूल्यमापन करून ग्रंथालयात वापर करून घेणे यासाठी ग्रंथपालाला बुध्दीमापन उपयोगी ठरते.

T.C
Assistant Professor
Shivaji College Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

PRINCIPAL
Shivaji College



65

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 182(H) Contemporary Innovation | April-2019
UGC Approved Journal

मनोरेखनाचे प्रत्यक्ष टप्पे

१. को–या कागदावर मध्यभगी मुख्य विषय अथवा कल्पना चित्ररुपाने मांडली जाते. यात कागदाचक मध्यभागच मुळ कल्पनेसााठी निवडला जातो कारण त्यामुळे मल्पनेला सर्व बाजुंनी व्यक्त होण्यास व विकसित होण्यास मदत होंते.

२. मध्य कल्पनेसाठी प्रतिमांचा, छायाचित्रांचा वापर केला जातो,कारण त्यामुळे मुख्य कल्पनेवर लक्ष केद्रित होते व एकाग्रता साधते.

३. दाखविण्यासाठी शब्दा ऐवजी चित्रे, रंगीत प्रतीमा यांचा वापर मुक्तपणे करावा.प्रत्येक व्यक्तीला सुचणारे उपविषय व संबंधीत कल्पना वेगळया असतील.

४. मध्यवर्ती विषयाला व्यक्तीला सुचलेल्या व वेगवेगळया दिशांनी जाणा–या उपविषयाच्या फांद्या व उपशाखा दाखविल्या जातात. येथे वक्ररेषांचा वापर करणे उपयुक्त ठरते कारण त्या एकसारख्या व कंटाळवाण्या दिसत नाहीत.

५. एखादया चांगल्या गोष्टीची कल्पनाचे आदर करून आभार मानने.

६. एखादया चांगल्या कल्पनेतुन सुचलेल्या गोष्टीचे वर्गीकरण करणे

एखाद्या विषयावरील कनोव्यापाराचा नकाशा त्या विषयाचे विशिष्ट व्यक्तीने केलेले विश्लेषण मांडतो. एखाद्याने आपल्या कल्पनांनुसार मनोरेखन करावे. आणि त्यावर इतरांच्या प्रतिक्रिया विचाराव्यात हेही या तंत्राला पोषक ठरते. त्यामुळे इतरांच्या कल्पनांची जोड मिळुन सर्वागीण विचाराला आणि कल्पना शक्तीला चालना मिळते. एखाद्या विषयाचे विविधांगी आणि सांगोपांग दर्शन अशा आकृतीमुळे सुकरपणे घडते. आकलन सोपे करण्याचे एक अभिनव साधन म्हणुन या तंत्राचा शिक्षणक्षेत्राने स्वीकार केला असुन अभ्यांसतंत्र म्हणुनही हे तंत्र गणले गेले आहे.

बुध्दीमापनाचे गुण

१) **बौध्दीक विकास**

बुध्दीमापन पुष्कळ कल्पना करू शकते. जसे की, आकृती क्रमांक १ मध्ये दाखविल्याप्रमाने संकल्पनांचा स्फोट कल्पना क,अ आणि ब हया मुख्य कल्पाना असुन त्यापुढील नविन कल्पना करतांना अशा प्रकारे प्रत्येक कल्पना नीवन तयार करीत असते. जी बुध्दीमत्ता विकासात महत्वाची असते.

२) **उत्तम शिकवणी** एखादा विषय चांगल्या प्रकारे समजण्यासाठी बुध्दीमापनाचा उपयोग होतो.

३) **एकुण आराखडा** चर्चा मधुन एखादा विषयाचा आराखडा समजण्यासाठी बुध्दीमापनाची मदत होते.

४) **टाचन घेण्यासाठी** टाचन घेणे आणि एखादा विषय सोप्या पध्दतीने शिकविण्यासाठी बुध्दीमापनाचा चांगल्या प्रकारे उपयोग होतो.

५) **निर्मिती** बुध्दिमापनाव्दारे एखादा विषय किंवा समस्या, अडचन सर्व बाजुस समजावुन घेण्यासाठी आणि नवीन कल्पनेसह बाहेर पडण्यासाठी मदत होते.

६) **सोपी पध्दती** बुध्दीमापनात गुंतागुतीचा घटना किंवा माहिती लक्षात ठेवण्यास मदत होते. उदा– एखाद्या विषयाचे स्पष्ट चित्रण चित्रीत करण्यासाठी आथवा विकसित करण्यासाठी मदत होते.

७) **चांगला प्रतीसाद** एखादा विषय ताबडतोब समजावुन चांगला प्रतिपादन व परीक्षेस मदत आणि तयारीसाठी महत्वाचे ठरते.

८) **योग्य कसोटया** बुध्दीमापनाच्या कसोटीच्या मदतीने योग्य विद्यार्थ्याची निवड करणे शक्य होते.



T.C.
Assistant Professor
Shivaji College Hingoli
Tq.& Dist.Hingoli (M.S.)
PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli
66

९) मार्गदर्शन करणे बुध्दीमापनामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार अभ्यासक्रमाची निवड करण्यासाठी विशिष्ट मार्गदर्शन करणे सुलभ होते.

**बुध्दीमापनाचे दोष / मर्यादा**

१ बुध्दीमापनाच्या कसोटया या बुध्दीमत्तेचे मापन करण्याचे प्रयत्न करतात. परंतु या कसोटयामध्ये पुर्णपणे विश्वसनियता अशी कसोटी नाही.

२ बुध्दीमत्ता म्हणजे काय? या बाबतीत अजुनही मानसशास्त्रज्ञाना एकवाक्यता नाही. त्यामुळे बुध्दीगुणांकावर कितपतं विश्वास ठेवावयाचा असा प्रश्न पडतो.

३ बुध्दीगुणांकावरून निश्चित अंदाज व्यक्त करता येत नाही.

४ बुध्दीमत्ता हि कसोटीच्या साहयाने फक्त मोजता येते. मात्र त्यात वाढ करता येत नाही.

५ बराच बुध्दीमापन कसोटया हया भौतिक, सामाजिक परीसराचा तसेच कसोटी देतेवेळेस मनस्थितीचा विचार करीत नाही. त्यामुळे त्यांच्या निष्कर्षावर मर्यादा पडतात.

**निष्कर्ष**

१ बौध्दीक मापनामुळे परीस्थितीनुसार वर्तनात बदल करण्याची क्षमता.
२ नवीन परिस्थितीशी सामावुन घेण्याची क्षमता.
३ बुध्दीमापनामुळे पुर्वानुभवांचा योग्य उपयोग करून घेण्याची क्षमता.
४ बौध्दीक मापनामुळे नवीन गोष्टीचे अकलन करण्याची क्षमता निर्माण होते.

**सारांश**

मनोरेखन हे विचारांना आणि कल्पकतेला वाव देणारे एक तंत्र आहे. या तत्राचा वापर सर्जनशील क्षेत्रात, उत्तम अभ्यासतंत्र म्हणुन तसेच ग्रंथालयशास्त्रात केला जातो. आपले मनोव्यापार व्यवस्थितपणे मांडुन एखादया विषयाचा सांगोपांग वेध घेणे ही प्रक्रिया या तंत्राच्या मुळाशी आहे. या तंत्रात शब्द,आकृत्या, रंग, प्रतिमा, यांचा मुक्त वापर केलेला आढळतो.हे तंत्र आपल्या कल्पना सुविहितपणे आणि सुसबध्दपणे मांडण्यासाठी उपयुक्त ठरते. व्यक्ती किंवा समुहासाठी या तंत्राचा उपयोग होतो.

सोपे साधारण विचार केल्यास प्रत्येक व्यक्तीमध्ये विशेष कार्यक्षमता असते. प्रत्येक गुण वेगळे असतात. सर्वाकडे बुध्दीमत्ता असली तरी त्याचा वापर करण्याची क्षमता कमी जास्त प्रमाणात असते असे नाही. त्यामुळे एखादया व्यक्तीकडे बुध्यांक किती आहे. ? हे पडताळुन पाहण्यासाठी विविध विचारवंतानी उपपती सिंध्दात मांडले आहे. ज्याव्दारे बुध्दीचे गुणांकन केले जाते. बुध्दीमापनामुळे स्वतःच्या व इतराच्या भावना ओळखुन त्याचा उपयोग योग्य करण्यासाठी स्वंयप्रेरणा जागृत करण्यासाठी, नाते संबध जपण्यासाठी, ग्रंथालयातील कामकाज व्यवस्थापन करण्यासाठी बुध्दीमापन महत्वाचे ठरते. बुध्दीमापनामुळे व्यक्तीच्या त्यांच्या मार्गावरील अडथळे दुर करून त्यांना प्रगती पथाकडे नेहण्याचे कार्य करते. एवढेच नव्हे तर जीवनात आनंद व समाधान देण्याचे महत्वपुर्ण कार्य करते.

**संदर्भ सुची**

१. गोंदे, रेवती. (२०१३). ''ग्रंथालय आणि सामाजिक विकास'' युनिर्व्हसल प्रकाशन , पुणे.
२. फडके, द.ना. (२०१५).''ग्रंथालय संगणकीकरन आणि आधुनिकिकरण.'' युनिर्व्हसल प्रकाशन , पुणे.



T.C.
Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(M.S.)
PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli
67

३. जोशी, प्र.न. (१९७०).''आदर्श मराठी शब्दकोश.'' विदर्भ मराठवाडा बुक्स, पुणे.

४. घुगे, प्रभाकर.(२०१०). ''वाचनाच्या सवयी आणि ग्रंथालये.''ग्रंथपरिवार.

५. रमेश, जनबंधु.(२०१०).''वाचन संस्कृती आणि ग्रंथालय चळवळ : एक आलेखन.'' ग्रंथालय मित्र स्मरविका.

६. वैध,विलास.(२०१०).''सार्वजनिक ग्रंथालय,वाचक,वाचनसंस्कृती. ग्रंथालय''मित्र स्मरविका.

७. Ambekar, N.G. (2007). "Mind Mapping". U.G.C. Sponsored Marathwad. Regional Seminar 24-25 March,Kumar Swami Mahavidyalaya, Ausa.

८. Chalukya, B.,(2007). "Mind Mapping Tecnique", U.G.C.Sponsored Marathwad Regional Seminar 24-25 March,Kumar Swami Mahavidyalay, Ausa .

९. करंदीकरख, सुरेश आणि जगताप, ह.ना. (२००६). "अध्ययन व अध्यापनाचे मानसशास्त्र",फडके प्रकाशन, कोल्हापुर.

१०. जगताप, ह.ना.(१९९६)."शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र."नुतन प्रकाशन, पुणे.

११. पाटील, लिला. (१९९६). "आजचे अध्यापन ", श्रीविद्याप्रकाशन , पुणे.

१२. बोंद्रे, अरविंद.(२००१)."व्यवसाय व्यवस्थापनाची मुलतत्वे." पायल प्रकाशन, नागपुर.

१३. पवार, श. पा. (२००२). "ग्रंथालय व माहितीशास्त्र."फडके प्रकाशन, पुणे.

१४. खेडकर, राजलक्ष्मी. (२०१४)."ग्रंथालय माहिती केंद्रांचे व्यवस्थापनषास्त्र".युनिव्हर्सल प्रकाशन,पुणे

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

T.C.
Assistant Professor
Shivaji College Hingoli.
Tq.& Dist. Hingoli (M.S.)



68